**कार्यालय पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, जालना**

**टोल फ्री क्रमांक 1064**

**कार्यालय दुरध्वनी क्र. :- 02482-220252**

**:: प्रेस नोट ::** दिनांक :- 17.12.2020.

**गट ग्रामपंचायत देऊळगाव उगले/ पिंपळखुटा ता. जाफ्राबाद, जि. जालना येथील ग्रामसेवक श्री. सतिश बाबुराव साबळे रा. साखरखेर्डा ता.सिंदखेड राजा जि.बुलडाणा यास 2,000/- रुपयांची लाच मागणी केल्याचे निष्पण्ण झालेवरुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालनाचे पथकाने पकडले.**

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | आरोपीचे नाव, हुद्दा व पत्ता | :- | आलोसे श्री.सतिश बाबुराव साबळे वय 32 वर्ष ग्रामसेवक गट ग्रामपंचायत देऊळगाव उगले/पिंपळखुटा पंचायत समिती जाफ्राबाद जि.जालना रा. साखर खेर्डा ता.सिंदखेड राजा जि.बुलडाणा |
| 2 | गुन्हा घडला तारीख व ठिकाण | :- | दि. 25/11/2020 रोजी 11.22 ते 13.03 वाजेच्या दरम्यान पंचायत समिती जाफ्राबाद येथील आवारामध्ये |
| 3 | लाचेची रक्कम | :- | 2,000/- रुपये. लाच मागणी |

याबाबत हकीगत अशी की, यातील तक्रारदार यांनी दि. 25.11.2020 रोजी तक्रार दिली कि, त्यांचे वडीलांच्या नावे असलेल्या घराचे नवीन बांधकाम केले असुन त्या ठिकाणी नविन शौचालयाचे बांधकाम पण केलेले आहे. शौचालय बांधकामासाठी पंतप्रधान शौचालय योजनेतुन शासनाकडुन 12,000/-रुपये अनुदान मिळत असते. त्यांना सदरचे अनुदान 12,000/- रुपये मंजुर झालेले असुन पंचायत समिती जाफ्राबाद यांचेकडुन तक्रारदार यांचा 12000/- रुपयांचा चेक तयार आहे. सदरचा चेक देण्यासाठी गट ग्रामपंचायत देऊळगाव उगले/पिंपळखुटा येथील ग्रामसेवक श्री. एस.बी.साबळे हे त्यांना 2000/- रुपये लाचेची मागणी केली. सदर कामासाठी तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना येथे संपर्क साधून तक्रार दिली. सदर तक्रारीवरुन दिनांक 25.11.2020 रोजी लाच मागणी पडताळणी सापळा लावला असता, लोकसेवक श्री. एस.बी.साबळे यांनी तक्रारदार यांना तुमचा शौचालय योजनेचा मंजुर झालेला चेक दयायचा असेल तर 2,000/- रुपये दयावे लागतील असे म्हणुन 2,000/- रुपये लाचेची मागणी पंचासमक्ष केल्याचे निष्पण्ण झाले आहे. म्हणुन त्यांचेविरुध्द लाच मागणीचा गुन्हा दाखल करुन त्यांना आज दि. 17.12.2020 रोजी ताब्यात घेण्यात आले आहे.

लोकसेवक श्री. सतिश बाबुराव साबळे वय 32 वर्ष ग्रामसेवक गट ग्रामपंचायत देऊळगाव उगले/ पिंपळखुटा पंचायत समिती जाफ्राबाद जि.जालना रा. साखरखेर्डा ता.सिंदखेड राजा जि.बुलडाणा यांचेविरुध्द लाच मागणी निष्पण्ण झालेबाबतचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**तसेच अँन्टी करप्शन ब्युरो जालना यांचे कडुन आवाहन करण्यात येते की, कोणी लोकसेवक शासकीय कामासाठी लाचेची मागणी करीत असल्यास किंवा खाजगी व्यक्ती मार्फत कोणी लाचेची मागणी करीत असल्यास 02482-220252, तसेच टोल फ्री क्रमांक 1064 वर संपर्क करावा. तसेच पोलीस उप अधिक्षक जालना मो.नं. 8975762906, पोलीस निरीक्षक मो.नं. 8390757835, 9823216788 वर संपर्क करावा.**

पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,जालना.